


# हॅलो प्रभात

नवे विचार...नवी सुरुवात

RNI NO. MAHMAR/2020/79996

■ संपादक : संजीव शाळगावकर

■ मुंबई ■ पुणे ■ अहिल्यानगर ■ कोल्हापूर ■ सातारा ■ सांगली

पुणे

● वर्ष : ०६ ● अंक : २७४ ● बुधवार, दि. ०७ जानेवारी २०२६ ● किंमत : ३ रूपये ● पाने : ४


## मी स्थानिक भाजप नेत्यांविरोधात बोललो : पवार

**पिंपरी : हॅलो प्रभात**

पिंपरी-चिंचवड महापालिकेतील भाजपच्या राजवटीवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी गंभीर आरोप केल्यानंतर भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आक्रमक भूमिका घेत पवार यांना प्रत्युत्तर दिले. याबाबत बोलणे टाळत पवार यांनी आपण स्थानिक भाजप नेत्यांविरोधात बोललो असताना संपूर्ण भाजपला बोलल्याचे माझे वक्तव्य वेगळ्या पद्धतीने फुगवून दाखविले. वक्तव्याचा विपर्यास केला. त्यामुळे भाजप नेते बोलले. आमच्यातील अंतर कसे वाढेल हे माध्यम पाहत आहेत असे म्हणत आरोप-प्रत्यारोपांचे आणि दोन्ही पक्षात वाढलेल्या तणावाचे खापर पवारांनी माध्यमांवर फोडले. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीतील दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस आणि घटक पक्षांच्या उमेदवारांची बैठक अजित पवार यांनी मंगळवारी कासारवाडीत घेतली. त्यानंतर माध्यमांशी त्यांनी संवाद साधला.

## संक्षिप्त...

### बिबट्या जेरबंद

**नारायणगाव : हॅलो प्रभात**

जुन्नर तालुक्यातील ओतूर येथील गाढवेपट परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचा वावर असल्यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते. या बिबट्याला जेरबंद करण्यात ओतूर वन विभागाला यश मिळाले. वन विभागाने ओतूर येथील गजानन पानसरे यांच्या शेतात २२ डिसेंबर रोजी पिंजरा लावला होता. या पिंजऱ्यात बिबट्या जेरबंद झाला. ओतूरचे वनपरिक्षेत्र अधिकारी चैतन्य कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल सारिका बुट्टे, वनरक्षक विश्वनाथ बेले, किशन खरोडे, किसन केदार, गणपत केदार, रोहित लांडे, प्रदीप तांबे यांनी घटनास्थळी जाऊन परिसराची पाहणी केली. नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत सर्व आवश्यक खबरदारी घेत बिबट्याला ताब्यात घेण्यात आले.

### दहशत, दोघे अटकेत

**पिंपरी : हॅलो प्रभात**

काळेवाडी परिसरात सार्वजनिक रस्त्यावर धारदार कोयते हवेत फिरवून लोकांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या दोन तरुणांना पोलिसांनी अटक केली आहे. ही घटना सोमवार (५ जानेवारी), मध्यरात्री १२.३० वाजण्याच्या सुमारास श्रीकृष्ण कॉलनी, काळेवाडी येथे घडली. गणेश संजय जाधव (२६, गवते चाळ, पिंपरी) आणि शुभम सुरेश गायकवाड (३२, श्रीकृष्ण कॉलनी, काळेवाडी) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल रमेश खेडकर यांनी फिर्याद दिली आहे..

### कोयत्यासह अटक

**पिंपरी : हॅलो प्रभात**

तडीपार गुंडाला रावेत पोलिसांनी शस्त्रसह ताब्यात घेतले. ही कारवाई रविवारी (४ जानेवारी) रात्री म्हस्के वस्ती, नवीन बीआरटी रोड रावेत येथे करण्यात आली. या प्रकरणात पोलीस कॉन्स्टेबल विनोद कदम यांनी फिर्याद दिली आहे. अमित गजानन वानरे (३५, आदर्श नगर, किवळे) असे अटक केलेल्या तडीपार आरोपीचे नाव आहे. आरोपीला पोलीस आयुक्तांच्या आदेशानुसार पिंपरी चिंचवड परिसरातून तडीपार करण्यात आले होते. असे असतानाही तो बंदी आदेशाचे उल्लंघन करून शहराच्या हद्दीत आढळून आला. त्याच्याकडे ६५० रुपये किमतीचा एक लोखंडी कोयता देखील मिळून आला असून तो त्याने गुन्हा करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगला होता. रावेत पोलीस तपास करत आहेत.

# भाजपाच्या मंत्र्याची मुक्ताफळे !

## छत्रपती शिवरायांविषयी अवमानकारक उद्गार : निवडणुकीच्या तोंडावर नव्या वादाला सुरुवात





**मुंबई : हॅलो प्रभात**

सध्या राज्यात महानगरपालिकेच्या निवडणुकीमुळे राजकीय वातावरण चांगलेच ढवळून निघाले आहे. सत्ताधारी आणि विरोधक एकमेकांवर सडकून टीका करत आहेत. असे असतानाच आता भाजपाचे गुजरातमधील नेते तथा केंद्रीय मंत्री सी. आर. पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी केलेल्या एका विधानामुळे आता चांगलाच वाद निर्माण झाला आहे. सी आर पाटलांच्या या विधानाचा आधार घेत ठाकरेंच्या शिवसेनेचे नेते खासदार संजय राऊत यांनी भाजपाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभं केलं आहे. तर भाजपानेही राऊतांवर पलटवार केला आहे. आता हा वाद आणखी पेटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सी आर पाटील एक सभेमध्ये बोलत होते. ते गुजराती भाषेत बोलताना दिसत आहेत. यावेळी बोलताना त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर भाष्य केले. मला खूप आनंद आहे की छत्रपती शिवाजी महाराज हेदेखील एक पाटीदार होते. त्यांनी हिंदू स्वराज्याची स्थापना यशस्वीपणे केली, असे सी आर पाटील म्हणाले. आता सी आर पाटील यांच्या याच विधानाचा आधार घेत संजय राऊत यांनी भाजपावर सडकून टीका केली आहे. "छत्रपती शिवाजी महाराज यांना गुजरातला पळवायचा प्रयत्न केला जात आहे. परंतु शिवाजी महाराजांनी तुमची सुरत लुटली होती. तिथे पळापळ, दाणादाण करून सोडली होती. हे त्यांनी विसरू नये," असा हल्लोबल संजय राऊत यांनी केला. तसेच शिवाजी महाराजांना जात लावू नये, असे आवाहनही त्यांनी भाजपाला केले आहे. भाजपाचे लोक छत्रपती शिवाजी महाराज यांना पळावायला लागले आहेत. हे निर्लज्ज लोक आहेत. तुमच्या गुजरातमध्ये काय महापुरुष नाहीत का? तिथे सगळे राक्षस आहेत का, असे विचारत राऊतांनी भाजपावर हल्लाबोल केला.

### नवनाथ बन यांचा पलटवार

**राऊतांच्या या टीकेला नंतर भाजपाचे प्रवक्ते नवनाथ बन प्रत्युत्तर दिले आहे. संजय राऊत यांना छत्रपती शिवाजी महाराज यांच्यापेक्षा अफजलखान जास्त प्रिय आहे. त्यांना अफजलखानाची पिलावळ जास्त प्रिय आहे. अफजलखानाचा उदोउदो करणे हे संजय राऊतांचे काम आहे, असे नवनाथ बन म्हणाले आहेत. त्यामुळे आता ठाकरे गट यावर काय पलटवार करणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.**

## राजकारणातील धुरंधर नेतृत्व काळाच्या पडद्याआड!

### सुरेश कलमाडी यांना भावपूर्ण श्रद्धांजली



**मुंबई : हॅलो प्रभात**

काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते, माजी केंद्रीय मंत्री सुरेश कलमाडी यांच्या निधनाने पुण्याच्या राजकारणातील धुरंधर नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे, अशा शोकभावना महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी व्यक्त केल्या आहेत.

सुरेश कलमाडी यांच्या निधनावर दुःख व्यक्त करून काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, सुरेश कलमाडी यांनी भारतीय वायुसेनेतल्या गौरवशाली कारकिर्दीनंतर समाजकारण आणि राजकारणाला सुरुवात केली. पुणे युवक काँग्रेस अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस अध्यक्ष म्हणून तरुणांचे संघटन केले. पुणे लोकसभा मतदार संघातून उमेदवारी मिळवत ते खासदार झाले. दीर्घ काळ त्यांनी पुणे लोकसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले. स्व. पी. व्ही. नरसिंहराव यांच्या मंत्रीमंडळात रेल्वे खात्याचे राज्यमंत्री म्हणून त्यांना जबाबदारी यशस्वीरित्या सांभाळली. भारतीय ऑलिम्पिक असोसिएशनचे अध्यक्ष म्हणून त्यांनी अनेक वर्ष कार्य केले. दिल्लीतल कॉमनवेल्थ गेम्स आणि पुण्यातील कॉमनवेल्थ युथ गेम्सचे यशस्वी आयोजन करून उत्तम क्रीडा प्रशासक असल्याचे त्यांनी सिद्ध केले. पुणे शहराच्या विकासात तसेच राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक जडणघडणीत त्यांनी मोलाचे योगदान दिले. पुणे मॅरेथॉन, चित्रपट महोत्सव आणि पुणे फेस्टिव्हलच्या माध्यामातून पुण्याचे नाव जागतिक पातळीवर पोहोचवले. विरोधकांनी त्यांच्यावर खोटे आरोप करून त्यांची प्रचंड बदनामी करत, त्यांच्या धडाकेबाज कारकिर्दीवर डाग लावण्याचा प्रयत्न केला. पण न्यायदेवतेने सर्व आरोपांतून त्यांची निर्दोष मुक्तता केली. पुणे शहरात काँग्रेस मजबूत करून कार्यकर्त्यांची पिढी त्यांनी घडवली. कलमाडी यांच्या निधनाने पुण्याच्या राजकीय, सामाजिक क्षेत्राची कधीही न भरून येणारी हानी झाली आहे. सुरेश कलमाडी यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी कलमाडी कुटुंबियांच्या दुःखात सहभागी असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.


## पुण्यात पुन्हा राजकीय पेच

**पुणे : हॅलो प्रभात**

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुण्यात राजकीय घडामोडींना वेग आला असून, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने पक्षाच्या आदेशाला न जुमानणाऱ्या पाच उमेदवारांवर शिस्तभंगाची कारवाई केली आहे. संयुक्त आघाडी ठरूनही काही प्रभागांत दोन्ही गटांचे उमेदवार समोरासमोर आल्याने व माघार घेण्याचे आदेश धुडकावल्याने ही कारवाई करण्यात आली. नवी पेठ-पर्वती (प्रभाग २७) आणि हडपसर गाव-सातववाडी (प्रभाग १६) या भागांत पक्षाने माघार घेण्यास सांगितलेल्या उमेदवारांनी आदेश न पाळता निवडणूक लढवण्याची भूमिका कायम ठेवली. त्यामुळे शरद पवार गटाच्या नेतृत्वाने संबंधित उमेदवारांवर शिस्तभंगाची कारवाई करत अधिकृत उमेदवारांना पाठिंबा जाहीर केला आहे. या निर्णयामुळे शहरातील राजकीय वातावरण तापले असून, आगामी निवडणुकीत याचे पडसाद उमटण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

■ शरद पवार गटाच्या पाच उमेदवारांवर कारवाई

## लिहिलेलं पुसता येतं, पण कोरलेलं नाही : रितेश देशमुखची पोस्ट



**लातूर : हॅलो प्रभात**

लातूर महानगरपालिका निवडणुकीसाठी भाजपाच्या वतीने नुकतंच बैठकीचं आयोजन करण्यात आलं होतं. या बैठकीत भाषण करत असताना रवींद्र चव्हाण यांनी महाराष्ट्राचे दिवंगत माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्याबद्दल केलेल्या एका वक्तव्यामुळे सध्या लातूरमधील राजकीय वातावरण चांगलंच तापलं आहे. विलासराव देशमुख यांचे सुपुत्र अमित देशमुख यांनी या वक्तव्याचा निषेध केला आहे. तर, रितेश देशमुखने सुद्धा यासंदर्भात व्हिडीओ शेअर केला आहे. सर्वांनी दोन्ही हात उंच करून घोषणा द्यायची आहे, भारत माता की जय, वंदे मातरम्, वंदे मातरम्, भारतीय जनता पार्टीचा विजय असो, खरंतर आपल्या सर्वांचा उत्साह पाहिला तर लक्षात येतंय की, १०० टक्के विलासरावांच्या आठवणी या शहरातून पुसल्या जातील, यात काही शंका नाही" असं वक्तव्य रवींद्र चव्हाण यांनी केलं होतं.

## मुंबईत मनसे, भाजपला शिंदेसेनेचा धक्का



**मुंबई : हॅलो प्रभात**

ऐन मुंबई महापालिका निवडणुकीच्या तोंडावर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला मोठा धक्का बसला आहे. भाजपानंतर आता शिंदेसेनेनेही मनसेला जोरदार हादरा दिला असून, पक्षाचे प्रवक्ते, सरचिटणीसांसह अनेक प्रमुख नेत्यांनी मनसेला रामराम ठोकत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत जाहीर प्रवेश केला आहे. त्यामुळे आगामी महापालिका निवडणुकीत मनसेची अडचण वाढण्याची चिन्हे आहेत.

मनसेचे माजी नगरसेवक संतोष धुरी यांनी नुकताच भाजपामध्ये प्रवेश केल्यानंतर हा दुसरा मोठा धक्का मानला जात आहे. आज झालेल्या प्रवेशात मनसेचे सरचिटणीस राजाभाऊ चौगुले, प्रवक्ते हेमंत कांबळे, मनसे चित्रपट सेनेचे सरचिटणीस राहुल तूपलोंढे, महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे संदेश शेट्टी, मुनव्वर शेख, जनहित कक्षाचे ॲड.

### प्रवक्ते, सरचिटणीसांसह नेत्यांचा पक्षाला रामराम

देवाशीष मर्क, प्रथमेश बांदेकर तसेच संतोष यादव यांचा समावेश आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या सर्व नेत्यांचे शिंदेसेनेत स्वागत केले. मुंबई महापालिका निवडणुकीत यंदा पहिल्यांदाच ठाकरे बंधू युतीच्या माध्यमातून एकत्र लढत असताना मनसेतील गळतीमुळे राजकीय समीकरणांवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मनसेसाठी ही गळती चिंताजनक ठरत असून, मुंबईतील पक्षसंघटनेसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.

## काँग्रेसचा झंझावात दिसेल : हर्षवर्धन सपकाळ

### विलासराव देशमुख यांचे व्यक्तीमत्व व योगदान निर्विवाद



**नागपूर : हॅलो प्रभात**

राज्यातील २८८ नगरपालिका निवडणुकांमध्ये काँग्रेस पक्षाला चांगला कौल मिळाला असून ४१ नगराध्यक्षांसह १००६ नगरसेवक विजयी झाले आहेत. नगरसेवकांच्या २ हजार जागांवर काँग्रेस दुसऱ्या क्रमांकावर आहे. नगरपालिका निवडणुकीतील हा झंझावात महानगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये दिसेल असा विश्वास व्यक्त करत लोकशाहीविरोधी भाजपा महायुतीच्या हुकूमशाही व ठोकशाहीला जनतेने धडा शिकवावा, असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले आहे.

नागपूर येथे पत्रकार परिषदेत बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, निवडणूका निष्पक्ष, पारदर्शी, करणे हे निवडणूक आयोगाचे कर्तव्यच आहे पण निवडणूक आयोगाची भूमिका पाहता त्यांनी विश्वासार्हतेला हरताळ फासला आहे. वोटचोरीचा मुद्दा काँग्रेस पक्षाने उचलून धरला, शेवटी मतदार याद्यांमध्ये घोळ आहेत, हे त्यांना मान्य करावे लागले पण पुढे त्यात काही सुधारणा झालेली दिसत नाही. निवडणूक आयोगाचे काम पाहता ते सत्ताधारी पक्षाच्या सांगण्याने काम करत आहेत हे दिसते. मतदार याद्यात घोळ, मतदान प्रक्रियेसाठी तारीख पे तारीख, अर्ज भरून घेताना विरोधकांची अडवणूक व सत्ताधाऱ्यांना मोकळीक दिली. रात्री १० वाजेपर्यंत प्रचार करण्यास मुभा दिली आहे, म्हणजे एकीकडे पैसा वाटा आणि मतदान केंद्राकडे दुर्लक्ष असा हा प्रकार आहे. आम्ही सुधारणार नाही अशीच भूमिका निवडणूक आयोगाची दिसत आहे. निवडणूक आयोग, प्रशासन व सत्ताधाऱ्यांनी लोकशाहीचे सर्व संकेत पायदळी तुटवले असून नंगानाच सुरु आहे. नगरपालिका व आता महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपा व मित्रपक्षांनी साम, दाम, दंड, भेद नितीचा वापर केला असून त्यांच्या मदतीला पोलीस, मंत्री, त्यांचे पीए तर आहेतच पण निवडणूक आयोगही त्यांना मदत करत आहे. यात विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचीही भर पडली आहे. नार्वेकर यांनी त्यांचे भाऊ, बहिण व वहिनी यांना बिनविरोध करण्यासाठी अत्यंत असभ्य वर्तन केले आहे, गुंडगिरी केली, विरोधकांना दमदाटी केली, त्याचे सीसीटीव्हीचे फुटेज प्रशासनाने गायब केले. सर्वबाजूने तक्रार झाल्यानंतर चौकशीचे आदेश दिले पण त्यातून नार्वेकर यांच्यावर कसलीच कारवाई केलेली नाही.

## प्रत्येक घराचे 'ड्रोन मॅपिंग' मोफत होणार

**पिंपरी चिंचवड : हॅलो प्रभात**



■ मंत्री चंद्रशेखर बावनकुळे ; प्राधिकरणबाधित नागरिकांना मिळणार 'प्रॉपर्टी कार्ड'

पिंपरी चिंचवड प्राधिकरण क्षेत्रातील बांधकाम व मिळकतींच्या मालकी हक्क प्रमाणपत्राचे ( प्रॉपर्टी कार्ड) महापालिका निवडणुकीनंतर वाटप करण्यात येईल असे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंगळवारी सांगितले. याशिवाय शहरातील प्रत्येक घराचे ड्रोन मॅपिंग केले जाणार आहे. प्रत्येक प्लॉटवरील प्रत्येक घराचा सरकारी नकाशा गुगल क्लाऊडवर दिला जाणार आहे, ज्या माध्यमातून थेट आपल्या मोबाईलमध्ये आपल्या नकाशा दिसणार आहे. पाचशे वर्षानंतरही आपले घर आपल्याला गुगलवर दिसेल. ही सर्व प्रक्रिया मोफत केली जाणार आहे असे देखील बावनकुळे म्हणाले. पिंपरी चिंचवड महापालिका सार्वत्रिक निवडणूक 2026 च्या निमित्ताने प्रभाग 17, 23 आणि 24 येथील उमेदवारांसाठी वाल्हेकरवाडी आणि थेरगाव येथे जनसंवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीमध्ये महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी पिंपरी चिंचवड निवडणूक प्रमुख तथा आमदार शंकर जगताप उपस्थित होते. दरम्यान सभेसाठी प्रभाग 17 मधील आशा सूर्यवंशी, नामदेव ढोके, पल्लवी वाल्हेकर, सचिन चिंचवडे तर प्रभाग 23 मधील मनीषा प्रमोद पवार, तानाजी बारणे, सोनाली गाडे, अभिषेक बारणे आणि प्रभाग 24 मधील उमेदवार सिद्धेश्वर बारणे, करिष्मा बारणे, गणेश गुजर आणि शालिनी गुजर हे उमेदवार उपस्थित होते. यावेळी चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, पिंपरी चिंचवडचे आमदार शंकर जगताप यांनी विधानसभेमध्ये प्रॉपर्टी कार्डचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यानंतर मी राज्यामध्ये तुकडा बंदी कायदा अंमलबजावणी केली . या कायद्यामुळे गुंठा, दीड गुंठा जागेमध्ये बांधलेल्या घरांची सरकार दरबारी नोंदणी करणे शक्य झाले. महापालिका निवडणुका झाल्यानंतर आपण आमदार शंकर जगताप यांनी मागणी केल्याप्रमाणे सर्व घरांचे प्रॉपर्टी कार्ड करून घेणार आहोत. मी स्वतः या प्रॉपर्टी कार्डचे वाटप करण्यासाठी शहरात येणार आहे. याशिवाय आपण येथील घरांचे ड्रोन मॅपिंग देखील करणार आहोत. येथील प्रत्येक घराचे ड्रोन मॅपिंग करून प्रत्येक प्लॉटचा सरकारी नकाशा आम्ही गुगल क्लाऊड वर देणार आहोत. ज्या माध्यमातून गुगलवर नाव टाकल्यानंतर घराचा नकाशा तुम्हाला उपलब्ध होणार आहे. यातून एक महत्त्वाचा सरकारी दस्तऐवज तयार होणार आहे.




## अमेरिकेच्या संपन्नतेला रक्ताचे डाग !

जगावर दादागिरी करण्यासाठी निघालेल्या डोनाल्ड ट्रम्प यांची अमेरिका संपन्न राष्ट्र असले, तरी तिच्या संपन्नतेला रक्ताचे डाग आहेत. अन्य देशातील खनिज संपत्ती लुटण्यासाठी तिथली सरकारे उलथवून टाकायची, तिथे रक्तपात घडवायचा, हे प्रकार वारंवार घडले आहेत. एकीकडे लोकशाहीचे गोडवे गायचे आणि दुसरीकडे दुसऱ्या देशात सत्तेवर कोणाला ठेवायचे, सत्ता कुणाकडे द्यायची, हा त्या देशातील नागरिकांचा हक्कच हिरावून घ्यायचा, ही अमेरिकेची दमनशाही आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात तर एकाधिकारशाही पुरेपूर भिनलेली. मीपणा आणि अहंकारी वृत्ती सोबतीला. त्यांच्या पूर्वसुरी अध्यक्षांनी इराकच्या तेलावर कब्जा मिळवण्यासाठी सद्दाम हुसेनला गुन्हेगार ठरवले, आता ट्रम्प तेच व्हेनेझुएलाबाबत करीत आहेत.

दुसऱ्या राष्ट्रांच्या खनिजावर डोळा : रशियाने युक्रेनमध्ये आक्रमण केले, म्हणून पूर्वी रशियाचे अध्यक्ष व्लादीमिर पुतीन यांच्याविरोधात गळा काढणारे आणि नंतर युक्रेनलाच काही भागावर पाणी सोडण्याचा सल्ला देणारे ट्रप आता जगातील अनेक देशांवर काहीही आरोप ठेवून हल्ले करीत आहे. व्हेनेझुएलाच्या मातीखाली दडलेल्या खजिन्याने जगाला, विशेषतः अमेरिकेला वेडे केले आहे. तिचा त्या खनिजांवर डोळा आहे. युक्रेनची पाठराखणही तिथल्या खनिज संपत्तीवर डोळा ठेवूनच ट्रम्प करीत होते, हे वेगळे सांगायला नको. तेल, सोने आणि खनिजांचे साठे कोणत्याही देशाला महासत्ता बनवू शकतात; पण सर्वकाही इतके मौल्यवान असूनही आज व्हेनेझुएला गरिबी, कर्ज आणि अराजकतेचा सामना करीत आहे. हा विरोधाभास या खजिन्याच्या ग्रहणाची खरी कहाणी आहे. व्हेनेझुएलामध्ये जगातील सर्वात मोठे तेल साठे आणि प्रचंड सोन्याचे साठे आहेत. जगाच्या एकूण साठ्यापैकी वीस टक्के तेल एकट्या व्हेनेझुएलात आहेत. असे असूनही जमिनीवरील वास्तव खूप वेगळे आहे. प्रश्न फक्त तेल काढण्याचा नाही, तर दशकांपासून कोसळत असलेल्या व्यवस्थेची पुनर्बांधणी करण्याचा आहे. ट्रम्प यांच्यासमोरील हे सर्वात मोठे आव्हान आहे. ट्रम्प व्हेनेझुएलामध्ये आपले हात का पोळून घेत आहेत, असा प्रश्न पडतो.

कंपन्या उत्पादन वाढवण्यासाठी अब्जावधी डॉलर्सची जमिनीखाली दबलेला खजिना केवळ तेव्हाच उपयुक्त आहे, जेव्हा व्यवस्था जमिनीवर मजबूत असेल. अमेरिकन कंपन्यांचे हीत आणि मादुरो यांच्यानंतरचा काळ या सर्वांचा एकत्रितपणे परिणाम जाणवण्यास ५ ते ७ वर्ष जाऊ शकतात; परंतु सध्या तरी, हा खजिना चमकण्यापूर्वी अनेक संकटाचा सामना करावा लागणार आहे. व्हेनेझुएला आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या नौदल नाकेबंदीचा सामना करत आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून अमेरिका कॅरिबियन प्रदेशात आपले लष्करी दल उभारत आहे. फोर्ड विमानवाहू जहाजदेखील या कारवाईत सहभागी आहे. दोन्ही देशांमधील वादाचा मुख्य स्रोत तेल आणि वायू आहे. तथापि, अमेरिकेचा असाही आरोप आहे, की व्हेनेझुएलाचे सरकार बेकायदेशीर ड्रग्ज व्यापारात सहभागी आहे. त्याचा अमेरिकन नागरिकांवर विपरीत परिणाम होत आहे. २०२५ मध्ये अमेरिकेने 'ऑपरेशन सदर्न स्पियर' सुरू केले आणि कॅरिबियन समुद्रात व्हेनेझुएलाच्या कथित ड्रग्ज तस्करी करणाऱ्या जहाजांवर हवाई हल्ले केले. अमेरिकन नौदलाच्या विमानांनी आतापर्यंत किमान २५ टँकरवर हल्ला केला आहे. ट्रम्प प्रशासन थेट आरोप करते, की व्हेनेझुएलाचे अध्यक्ष निकोलस मादुरो स्वतः बेकायदेशीर ड्रग्ज व्यापारात सहभागी आहेत. अमेरिकेचा दावा आहे, की मादुरो एक 'नार्को-दहशतवादी' संघटना चालवतात आणि अमेरिकेत ड्रग्जची तस्करी करत आहेत. फिर्यादी स्वत:, तपास अधिकारीही स्वत: आणि न्यायदानही स्वतः करायचे, ही अमेरिका आणि ट्रम्प यांची नीती असून, पुढील काळात क्युबा, कोलंबिया हे दक्षिण अमेरिकेतील देश आणि त्यानंतर ब्राझील आणि भारत हे 'ब्रिक्स' परिषदेतील देश अमेरिकेचे लक्ष्य असतील. रक्ताला चटवलेल्या श्वापदासारखी ट्रम्प यांची अवस्था आहे, त्यापासून सावध राहण्याची गरज आहे.

# दलदलीत अडकलेले राजकारण




**हॅलो प्रभात**

दलदलीत अडकलेला मनुष्य त्यातून सुटका करून घेण्यासाठी जेवढी जास्त धडपड करतो,तेवढा तो दलदलीत अधिकाधिक रुतत जातो. सध्या आपल्या संपूर्ण मिडियावर आणि एकूणच समाज जीवनावर राजकारण्यांनी रोज एकमेकांवर केलेल्या अभद्र आरोपांचे गडद अभ्र दाटून आले आहे.समाजाला ही बिन पैशाची करमणूक वाटते आहे.तो ही रोज राजकारण्यांना कचकटून शिव्याशाप देतो आहे.

सध्याच्या राजकारणात निवडून येण्याच्या मेरिटचा विचार करता जो जास्त गुंतवणूक करेल,त्याला तिथून पुढे राजकीय पक्षाच्या तिकिटाची,जातीय ध्रुविकरणाची,त्या उमेदवाराच्या जनसंपर्काची, त्याच्या समाजातील प्रतिमेची अनुकूलता असेल, तर त्या प्रमाणात निवडून येण्याची शक्यता वाढते.

फक्त शक्यता वाढते, निवडून येण्याची खात्री नाही !

आपण आणि आपला पूर्ण समाजच एका दुष्टचक्रात अडकलो आहोत, रोज या राजकारणाच्या दलदलीत अधिकाधिक रुतत चाललो आहोत, हे सामान्य मनुष्यापेक्षा खूप चाणाक्ष असलेल्या राजकारण्यांना समजत नाही का ?

समजत नाही, असं माझं स्पष्ट मत आहे !

एखाद्या नशेच्या अंमलाखाली असलेल्या मनुष्याला त्याच्या वागण्या बोलण्यात असलेली विसंगती कळेनाशी होते. अगदी तशीच अवस्था आपल्या राजकारण्यांची आज झालेली आहे. ही समस्या दिवसेंदिवस अधिकाधिक जटील होत चालली आहे.ती सोडवण्याची सध्याच्या राजकारण्यांची क्षमताच उरलेली नाही.डोंगर उतारावर चालताना काळजीपूर्वक प्रत्येक पाऊल टाकावं लागतं.दोन चार पावले गाफीलपणाने टाकली, तर पुढची पावले टाकावीच लागत नाहीत, कारण तोल जाऊन गडगडत कडेलोट होतो !

राजकारणाची आणि विशेषतः सत्तेची चव एकदा चाखली,कि त्याची नशा त्या मनुष्यावर इतकी वर्चस्व गाजवायला लागते,कि त्याचे अगदी साध्या साध्या गोष्टींचे भान सुटत जाते. तो त्याची तोंड फाटेस्तोवर स्तुती करणा-यांमधे वावरायला लागतो.त्याला त्याच्या भल्याचा खरा निरपेक्ष सल्ला देणारी जवळची माणसं नकोशी वाटायला लागतात.त्याच्या जवळपास नेहमी अशीच माणसं आशाळभूतपणे घोटाळताना दिसतात, ज्यांना सत्तेच्या परीस स्पर्शाने काही पदरात पाडून घ्यायचं आहे !

ही माणसं मोठी चलाख असतात. ते वारं कोणत्या दिशेला वाहतंय याचा अचूक कानोसा घेऊन आपले रंग बदलण्यात कुशल असतात. ते कोणाचेच नसतात. ते फक्त त्यांच्या स्वतःच्या स्वार्थाशी घट्ट बांधलेले असतात.ते पक्के धंदेवाईक असल्याने स्वतःचे सर्वस्व कधीच पणाला लावत नाहीत. गळाला आमीष लावून त्याचा फास एखाद्या माशाच्या गळ्यात चांगला रुते पर्यंत शांतपणे वाट पाहतात.

खूप मोठे राजकारणी अशा बिलंदर बोक्यांच्या गळाला लागतात. सत्ता असेपर्यंत सगळं ठीकठाक चालू राहतं,पण सत्ता गेली,कि जणू टपून बसलेले सगळे पापग्रह हात धुवून मागे लागतात. राजकारण्यांना अवतीभोवती असलेली माणसे, कार्यकर्ते सांभाळण्यासाठी त्यांच्या उपद्व्यापांकडे दुर्लक्ष करावं लागतं,त्यांची पापं आपल्या उरावर घ्यावी लागतात.मग कोणी मूर्ख मनुष्य घर जाळून तर काही कोळश्याची वखार घालत नाही ना ? त्यालाही सत्तेच्या वाहत्या गंगेत हात धुवून घेण्याचा मोह होतो. सत्ता आज आहे, उद्या नसेल! अशी भीती त्याच्या मनात सतत असल्याने सत्ता नसेल तर स्वतःभोवती असलेली प्रभावळ सांभाळण्यासाठी लागणारा पैसा कुठून आणणार ? अशा टप्प्याटप्प्यांनी राजकारणी या दलदलीत स्वतःच्या ही नकळत रुतत जातो.

जसं गुन्हेगारीत एकदा पाऊल टाकले,कि मनुष्याने कितीही त्यातून बाहेर पडण्याची धडपड केली, तरी त्याचे साथीदार त्याला त्यातून बाहेर पडू देत नाहीत.

जे जीवाला जीव देणारे वाटतात,तेच तुमचा जीवही सहज घेऊ शकतात. प्रत्येक खेळाचे काही नियम असतात,तसेच गुन्हेगारीचे, अर्थकारणाचे,समाजकारणाचे,राज कारणाचे काही प्रस्थापित झालेले नियम असतात.ते बदलणं एकट्या दुकट्याला शक्य नसतं, पण यामुळे काळ सोकावता कामा नये, यासाठी आजच्या राजकारणाला आणि राजकारण्यांना दलदलीत ओढणा-या सर्व अभद्र गोष्टी खूप प्रयत्नपूर्वक बदलाव्याच लागतील,कारण आताच्या राजकीय व्यवस्थेचे पतन जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रालाच आता ग्रासायला लागले आहे.

तरुण पिढीला पाहता पाहता कीड लागायला लागली आहे.

संपूर्ण समाजच कमी किंवा जास्त किमतीत स्वतःला बाजारात विकायला तयार व्हावा,असं भयावह दृश्य सर्वत्र दिसतंय. याहून वाईट गोष्ट ही आहे,कि तो एकाला विकला जातो, आणि कोणी त्यापेक्षा जास्त किंमत देणारा वाटेत भेटला, तर लगेच पहिल्याचा हात सोडून तो दुसऱ्यासोबत चालायला लागतो, आणि पहिल्याला - तुझे पैसे कुठे कष्टाचे आहेत ? असं विचारायला कमी करत नाही.

राजकारणी कसेही असले, तरी आजही समाजाच्या मदतीसाठी धावून येणारं त्यांच्या शिवाय कोणी नाही,याची समाजाने मनात पक्की जाणीव ठेवावीच.

जे सरकारी नोकर भरपूर पगार आणि सवलती पदरात पाडूनही उघड भ्रष्टाचार करताना दिसतात, त्या पार्श्वभूमीवर राजकारणातून समाजाचे जे लोकप्रतिनिधी निवडून समाजाचा कारभार चालवतात, त्यांना निवडून येण्यासाठी, वेगवेगळ्या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी, त्यासाठी जनसंपर्क ठेवण्यासाठी किती पैसा आवश्यक आहे,याचा एकदा शांतपणे विचार करावा लागेल.

राजकारण्यांनी आपल्या घरादारावर निखारा ठेवून कुटुंबियांना वा-यावर सोडून राजकारण करणे यापूर्वी आणि आताही कधीच शक्य नव्हते आणि भविष्यातही शक्य होणार नाही.

त्यामुळे याचा गंभीरपणे विचार करावा लागेल,कि आपल्या व्यवस्था चालवण्यासाठी सरकारी नोकरशाहीवर जसा एकूण महसुली उत्पन्नातून काही हिस्सा खर्च होतो,तसाच लोकप्रतिनिधी निवडून देणा-या राजकीय व्यवस्थेसाठी सरकारला मिळणाऱ्या उत्पन्नातून काही हिस्सा खर्च करावा लागेल.हे वास्तव आजपर्यंत न स्वीकारता केवळ आदर्शवादाच्या भंपक कल्पनांच्या आहारी जाऊन आपल्या समाजाला दांभिकतेची लागण झाली आहे.तो बोलतो एक आणि करतो वेगळंच.

आपल्या समाजाची घसरत चाललेली गाडी रुळावर आणण्यासाठी आपल्या सरकारी महसूलापैकी दहा किंवा पंधरा टक्के रक्कम जाणीवपूर्वक राजकीय व्यवस्थेसाठी कागदोपत्री पारदर्शकतेने खर्च करायला सुरुवात केली, तर एखाद्या चांगल्या चालणा-या व्यवसायासारखी राजकीय व्यवस्था चाकोरीत चालायला लागेल असे वाटते.

मग राजकारणी समाजाला जास्त उत्तरदायी राहतील.

त्यांना राजकारणात वेळ घालवताना असुरक्षित वाटणार नाही. पैसा मिळवण्याचे अवैध मार्ग शोधावे लागणार नाहीत.गुन्हेगारी क्षेत्रातील लोकांशी संबंध ठेवावा लागणार नाही. सरकारी यंत्रणांवर अधिक काटेकोर नियंत्रण ठेवणं शक्य होईल.त्यामुळे सरकारी यंत्रणा अधिक कार्यक्षमतेने, पारदर्शकतेने काम करू लागतील.


सध्या राजकारणासाठी लागणारी रक्कम परत मिळविण्याच्या खटाटोपात सरकारी नोकरशाहीच्या हातात हात घालून पैसा मिळवणं अपरिहार्य झाल्याने आपल्या सर्वच क्षेत्रात भ्रष्टाचाराची कीड लागली आहे, आणि तो पूर्ण नियंत्रणाबाहेर गेला आहे,जे आपल्या समाजासाठी आणि देशासाठी आत्मघातकी ठरू शकतं, नव्हे आताच ठरतंय !

त्यामुळे राजकारण्यांनी आता एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करत एकमेकांच्या आर्थिक भानगडींची लक्तरे गावाच्या वेशीवर न टांगता पारदर्शकपणे राजकारणाचं आर्थिक गणित मांडून ते समाजाला स्वीकारायला लावण्यासाठी काही प्रयत्न सुरू करावेत,मग एखाद्या दशकात काही बदल होण्याची आशा धरता येईल.

# सबसे बडा खिलाडी, सुरेश कलमाडी!

**हॅलो प्रभात**

**महाराष्ट्रातले एकेकाळचे काँग्रेसचे खंबीर नेतृत्व, पुण्याचे माजी खासदार, माजी केंद्रीय राज्यमंत्री तसंच भारतीय ऑलिम्पिक संघटनेचे माजी अध्यक्ष सुरेश कलमाडी यांचं मंगळवारी पहाटे दीर्घ आजारानं निधन. त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली...!**



तीनेक वर्षापूर्वी त्यांचं बऱ्याच वर्षानंतर दर्शन पुणेकरांना झालं होतं. उंच धिप्पाड शरीरयष्टी, छोटीशी राखलेली दाढी, झर झर चालण्याची स्टाईल, मागे कार्यकर्त्यांची झुंड, त्यांची लगबग असं दृश्य पाहणाऱ्यांना तेव्हाची त्यांची ती पांढरी दाढी, थकलेलं, झुकलेलं शरीर, काठीचा आधार घेऊन चालणारे कलमाडी असं सार्वजनिक दर्शन पुणेकरांना व्यथित करून गेलं होतं. ते पुणे फेस्टिव्हलचं निमंत्रण द्यायला पुणे महापालिकेत आयुक्तांना भेटायला आले होते. अशा अवस्थेत कलमाडींना पाहून सर्वांना धक्काच बसला होता.

'सबसे बडा खिलाडी.... सुरेश कलमाडी...!' अशी घोषणा निवडणुकीच्या काळात दिली जात असे. अगदी त्याला अनुरूप त्यांचं सार्वजनिक जीवनात वागणं होतं. ते नाना चुडासामा यांच्या जेसीज', 'जायंटस इंटरनॅशनल' या समाजभावी क्लबांमार्फत उभ्या केलेल्या कामांतूनच समाजापर्यंत पोहोचले. १९७२ मध्ये त्यांच्या पुढाकाराने भारतभर 'जायंट्स'तर्फे विविध सेवाकार्ये केली. त्यानंतर ते शरद पवार यांच्या संपर्कात आले. त्यांच्यामुळे त्यांचं राजकीय जीवन बहरलं. नरसिंहराव यांच्या विरोधात शरद पवार यांना प्रधानमंत्री करण्यासाठी अयशस्वी प्रयत्न केले होते. त्यानंतर नरसिंहराव यांनी त्यांना रेल्वेचे राज्यमंत्री केलं होतं. मंत्रिपदाच्या अल्पकाळात पुणे स्टेशनचा विकास केला, तिथं सरकता जीना त्यांनी बसवला होता. महापालिकेत एका ज्येष्ठ नगरसेवकाने आपल्या भाषणात स्व. कलमाडी यांच्या कामाच्या झपाट्याबाबत सांगताना 'साडेतीनशे वर्षानंतर पुण्याच्या विकासाचा पाया कलमाडी यांनी घातला होता...!' असं म्हटलं होतं. ते खरंही होतं याचा अनुभव आपण घेतो आहोत. त्यांनी आपल्या खासदारकीच्या कार्यकाळात जो काही विकास केला. त्यांच्यानंतर तसा फारसा कुणी केलाच नाही. कलमाडी प्रचंड ऊर्जा असलेला नेता होते. एकदा का मनांत आलं की, त्याच्या मागे झपाटल्यासारखे लागायचे. पुण्याचा गणेशोत्सव आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्याचा 'पुणे फेस्टीव्हल' प्रयत्न त्यांनी केला. त्यासाठी भव्य असे 'गणेश कला क्रीडा मंदिर' उभारले. आशियाई क्रीडा स्पर्धेच्या निमित्तानं म्हाळुंगे बालेवाडी इथं उभारलेलं 'भव्य क्रीडा संकुल' उभारले, आंतरराष्ट्रीय 'चित्रपट महोत्सव', आंतरराष्ट्रीय 'मॅरेथॉन', या साऱ्या उपक्रमाच्या निमित्तानं राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, शिक्षण, क्रीडा, अशा विविध प्रकारची मंडळी एकत्रित केली, त्यांना व्यासपीठ निर्माण करून दिलं. ज्यामुळे पुणेकरांचा सहभाग वाढला. पुण्याचा नावलौकिक वाढला, अनेक कार्यकर्ते घडवले. हे त्यांचे विरोधकही मान्य करतात. आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक संघटनेचे ते पदाधिकारीही होते. त्यांच्यासोबतच अनेक प्रसंग आजही आठवतात. त्यांच्या प्रत्येक कार्यक्रमात देशभरातले व्हीआयपी असायचे. त्यांच्याशी त्यांचं वागणं सहजतेचं असायचं मग ते राजीव गांधी असो नाही तर अमिताभ बच्चन. अशा साऱ्यांनी त्यांचं सहज वागणं अचंबित होत असे. देशभरातल्या उद्योगपतींशीही त्यांचे असेच मैत्रीचे संबंध होते. त्यामुळं त्यांना ते एकेरी नावानं हाका मारत. कलमाडींना पाहणं, त्यांच्यासोबत वापरणं, त्यांचा कामांचा झपाटा अनुभवणं तेव्हा खरंच विलक्षणीय होतं. कलमाडींचा आवाका आणि दराराच इतका काही होता की पुण्याच्या राजकारणात त्यांचं विशिष्ट स्थान होतं. दोनवेळा लोकसभा आणि तीनवेळा राज्यसभा सदस्य, जवळपास ३५ वर्षे राजकारण केले. एकेकाळी आंतरराष्ट्रीय इमेज असलेले सुरेश कलमाडी यांना १९७७ पासून असंख्य वेळा पाहिलेलं. आणिबाणी काळात शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघातून कलमाडी आमदारकी लढले, आणि जनता पक्षाच्या शांती नाईक यांच्याकडून पराभूत झाले,हा इतिहास कोणाला फार माहीत नसेल. कलमाडी नॅशनल डिफेन्स अकॅडमीचे विद्यार्थी. पायलट होते.. 'देशभक्त वैमानिकाला निवडून द्या' असं तेव्हा म्हटलं जाई. 'पुण्याचं विकास' हा त्यांचा आवडता शब्द आणि ध्यास. कन्नड हेल मिश्रित मराठीत बोलत कलमाडींनी पराजयालाच पराभूत केलं. यशाच्या शिड्या चढत ते लोकसभेवर निवडून गेले, राज्यसभा गाजवली. तत्कालीन कॉंग्रेस अध्यक्ष सिताराम केसरी यांच्याशी थेट वाकडं घेत त्यांनी स्वतःची वेगळी आघाडी स्थापन केली. भाजपच्या पाठिंब्याने लोकसभाही लढले. वाजपेयींनी त्यांच्या विरोधात असलेल्या आघाडीला, संघ परिवाराला विनंती करत कलमाडींना साथ देण्याचं ठरवलं. पुण्यात येऊन भाजप बंडखोर अविनाश धर्माधिकारींना जाहीरपणं माघार घेण्याचं आवाहन केलं. कलमाडी प्रचंड प्रयत्न करुनही हारले. 'भाईं'नी पुण्यावर राज्य केलं. अक्षरशः झोपडपट्टीतले, भाईगिरीतले लोक नगरसेवक केले.. देशपातळीवर कलमाडी नेहमी चर्चेत राहिले..पण घात झाला. जेलवारी करावी लागली. हा अफाट माणूस खचला, विस्मरणात गेला. त्याचं वाईट वाटलं. त्यांच्या निधनानं पुण्याच्या विकासाचं व्हिजन असलेला नेता हरपलाय. दीर्घकाळ सार्वजनिक जीवनात सक्रिय राहून देशाच्या समाजकारण, राजकारण आणि प्रशासकीय व्यवस्थेत आपल्या कर्तृत्वाचा व नेतृत्वाचा स्वतंत्र ठसा उमटवणारे ज्येष्ठ नेते सुरेश कलमाडी यांना भावपूर्ण श्रद्धांजली! आम्ही सर्वजण कलमाडी कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहोत. या कठीण प्रसंगातून सावरण्याचे बळ त्यांना मिळो, हीच प्रार्थना...

## रणधुमाळीतच पडले राष्ट्रवादी काँग्रेसला खिंडार

### पक्षाच्या शहर उपाध्यक्ष महेश पाटील व सहकाऱ्यांचा भाजपात प्रवेश




**पुणे : हॅलो प्रभात**

ऐन पालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर उपाध्यक्ष यांच्यासह पक्षाचे विभाग अध्यक्ष नानासाहेब नलावडे,पक्षाचे वरिष्ठ नेते राजेंद्र खांदवे यांनी भाजप पक्षात प्रवेश केल्याने वडगाव शेरी मतदार संघातच नव्हे तर पुणे शहरात देखील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला खिंडार पडल्याची जोरदार चर्चा रंगली आहे. वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघातील मतदारसंघाचे गेल्या 20 वर्षापासून असलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष व माजी शिक्षण मंडळ सदस्य मा. नानासाहेब नलावडे, राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा पवार गट पुणे शहराचे उपाध्यक्ष महेश पाटील, यांच्यासह राष्ट्रवादीचे जेष्ठ नेते राजेंद्र खांदवे यांच्यासह भाजप पक्षात प्रवेश केल्याने या तीन ही नेत्यांनी भाजप पक्षात जाहीर प्रवेश केल्याने वडगाव शेरी विधानसभा मतदार संघात राष्ट्रवादी काँग्रेसला धक्का बसल्याने भारतीय जनता पार्टी मध्ये मा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहळ, चंद्रकांत पाटील, माधुरी, मिसाळ, पंकजा मुंडे हा प्रवेश जगदीश मुळीक सुरेंद्र पठारे व मंगेश गोळे यांच्या मार्गदर्शनखाली करण्यात आला असून या वेळी मोठया संख्येने तरुण वर्गा सोबत प्रवेश केला, नानासाहेब नलावडे हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात एकनिष्ठ व प्रामाणिक पणे काम करत होते त्यांचे सामाजिक क्षेत्रात व राजकीय क्षेत्रात मोठी कारकीर्द असून त्यांना उमेदवारी नाकारण्यात आणि त्याच प्रमाणे महेश पाटील हे गेल्या 22 वर्षा पासून राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये कामगार क्षेत्रात कार्यरत होते व मागील 5 वर्षा पासून पुणे शहर उपाध्यक्ष म्हणून काम करत होते त्यांच्या मागे मोठया प्रमाणात महिला व तरुण वर्ग असल्याचे बोललात त्यांना सुद्धा पक्षाने संधी दिली नाही त्यांना सुद्धा पक्षाने संधी नं देता आयात उमेदवार जाहीर केला म्हणून या तीनही लोकांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सोडचिट्टी दिली यांनी भाजपा. मध्ये प्रवेश करण्याची भूमिका घेतली यांच्या भाजपा प्रवेशामुळे राष्ट्रवादी काँग्रेसला शहरात मोठा फटका बसण्याची शक्यता वर्तवली जातं आहे.

## ड्युव्हील इस्टेटसचा कामगार वसाहतीतील मुलांसाठी उपक्रम


**पुणे : हॅलो प्रभात**



**ड्युव्हील इस्टेटसने आपल्या सामाजिक उपक्रम ब्रँड 'ड्युव्हील केअर्स' अंतर्गत कामगार वसाहतीत 'टॉय डोनेशन ड्राइव्ह' आयोजित करून सणासुदीचा काळ आपुलकी आणि संवेदनशीलतेने साजरा केला. रिव्हरडेल हाइट्स, रिव्हरडेल रेसिडेन्सेस आणि रिव्हरडेल स्वीट्स या संकुलांमधील सुमारे सहा हजार रहिवाशांचा समावेश असलेल्या ग्राहक समुदायाकडून मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदविण्यात आला.**

## राडोचे कतरिना आणि हृतिकसोबत नवीन अभियान

**मुंबई : हॅलो प्रभात**



**आपल्या नवीन अभियानासाठी राडोने कतरिना कैफ आणि हृतिक रोशन या आपल्या दोन प्रसिद्ध जागतिक अम्बॅसडर्सना एका दृश्यात्मक क्रिएशनमध्ये एकत्र आणले आहे, ज्यात प्रत्येक बाबतीत परस्पर विरोधी असलेली दोन जगं एकमेकांकडे आकृष्ट होतात व शेवटी एकत्र होतात. या दोन्ही कलाकारांशी केलेल्या राडोच्या पहिल्या भागीदारीच्या यशानंतर, आता या स्विस घडयाळ निर्मात्या कंपनीने एक नवीन दमदार नॅरेटीव्ह सुरू केले आहे .**

नवे विचार...नवी सुरुवात
दैनिक हॅलो प्रभात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली – ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक **हॅलो प्रभात**, कार्यालय, स.न.१४/१५/२/३, फ्लॅट नं.२०, शिवपुष्प, ए पार्क, वडगाव बु., पुणे– ४११०४१. (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले.
■ **पुणे कार्यालय :** १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे-४११०३० ■ **पुणे संपर्क : ८५५१०५५११३**
■ **कोल्हापूर कार्यालय :** एस ९४६, GF-7, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर-४१६००२
■ **सांगली मुख्य कार्यालय :** कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली. ■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)
■ मुख्य संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर ■ संपादक : संजीव शाळगावकर

## बोलावलं अन् काटा काढला; तरुणाचे अपहरण करून हत्या

**पुणे : हॅलो प्रभात :** १७ वर्षांच्या अल्पवयीन मुलाचे अपहरण करून त्याची निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना पुणे शहरातून उघडकीस आली आहे. अमरसिंह गचांड (१७) असे खून झालेल्या मुलाचे नाव असून, आरोपींनी इंस्टाग्रामवर एका मुलीच्या माध्यमातून ओळख करून त्याला जाळ्यात ओढल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे. चार महिन्यापूर्वी अमरसिंह गचांड याने एका व्यक्तीच्या खुनाचा प्रयत्न केला होता. या प्रकरणी उत्तमनगर पोलीस ठाण्यात त्याच्यावर गुन्हा दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. याच पार्श्वभूमीवर अमरसिंह आणि आरोपींमध्ये काही दिवसांपूर्वी वाद झाला होता. प्राथमिक माहितीनुसार, याच वादातून त्याचा काटा काढण्याचा कट रचण्यात आला. २९ डिसेंबर रोजी अमरसिंह सकाळी घरातून बाहेर पडला. त्यानंतर आरोपींनी एका मुलीच्या माध्यमातून त्याला कात्रज परिसरात बोलावून घेतले. तेथून त्याला खेडशिवापूर परिसरात नेण्यात आले, जिथे आरोपींनी दगड आणि कोयत्याने वार करून त्याचा निर्घृण खून केला. खून केल्यानंतर पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने पाणी अडवण्यासाठी तयार करण्यात आलेल्या चारीत मृतदेह पुरून टाकण्यात आला. दरम्यान, अमरसिंह घरी न परतल्याने कुटुंबीयांनी शोधाशोध सुरू केली. त्याचा मोबाईल फोन बंद येत होता, तसेच त्याची दुचाकी (TVS Access) देखील कुठे आढळून आली नाही. २४ तासांनंतर कुटुंबीयांनी विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तपासात त्याचे शेवटचे लोकेशन लोणावळा परिसरात असल्याचे समोर आले.

## थोडक्यात पण महत्वाचे

### प्रशांत धंगेकरची राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड

**पुणे : हॅलो प्रभात**



येथील अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजीनियरिंग आणि रिसर्च महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स-व्ही एल एस आय डिझाइन अँड टेक्नॉलॉजी इंजीनियरिंग च्या तृतीय वर्षात शिक्षण घेत असलेला विद्यार्थी कु. प्रशांत विलास धंगेकर याची आखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ बॉल बॅडमिंटन संघात निवड झाली. या स्पर्धा जानेवारी मध्ये भारतीदासन युनिव्हर्सिटी तिरुचिरापल्ली, तामिळनाडू मध्ये पार पडणार आहेत. प्रशांत च्या या निवडीमुळे महाविद्यालयाचा नावलौकिक वाढला असून इतर खेळाडूंमध्ये उत्साहाचे वातावरण तयार झाले आहे. या त्याच्या यशासाठी संस्थेच्या सरचिटणीस मा. सौ. प्रमिलाताई गायकवाड, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील ठाकरे, विभागप्रमुख प्रा. स्नेहल वीर व सर्व प्राध्यापकांनी त्याचे अभिनंदन करून राष्ट्रीय पातळीवर सुवर्ण यशासाठी शुभेच्छा दिल्या. प्रशांत च्या या चमकदार यशासाठी महाविद्यालयाचे क्रीडा संचालक डॉ. नवनाथ सरोदे यांचे मोलाचे प्रशिक्षण व मार्गदर्शन लाभले.

### द बॉडी शॉपचा एण्ड ऑफ सीझन सेल

**मुंबई : हॅलो प्रभात**

द बॉडी शॉप या ब्रिटीश आंतरराष्ट्रीय एथिकल ब्यूटी ब्रँडने आपल्या बहुप्रतिक्षित एण्ड ऑफ सीझन सेलच्या लॉचची घोषणा केली आहे, जेथे श्रेणींवर आकर्षक ऑफर्स आहेत. अविश्वसनीय दरांमध्ये पसंतीच्या आवश्यक वस्तू खरेदी करण्यास ग्राहकांना आमंत्रित करणारा ईओएसएस महिनाभर सुरू राहणार आहे. द बॉडी शॉप आपले फुल फ्लॉवर्स फ्रॅग्रन्स कलेक्शन, मेकअपच्या वस्तू, जसे सेकंड स्किन, फ्रेश न्यूड आणि क्रेयॉन श्रेणींवर जवळपास ५० टक्क्यांची मोठी सूट देखील देत आहे.

### सुड शकारंभ चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित!

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**




गावकुसाबाहेर पेटलेला सत्तेचा संघर्ष, अहंकारातून उफाळलेला सूड आणि नात्यांची राख करणारा विश्वासघात या सगळ्यांचा अंगावर काटा आणणारा अनुभव देणाऱ्या मराठी अ‍ॅक्शन-ड्रामा-थ्रिलर 'सुड शकारंभ' सिनेमाचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला आहे. ट्रेलरने रिलीज होताच प्रेक्षकांच्या मनात उत्सुकतेची खळबळ उडवली आहे. हा चित्रपट १६ जानेवारी २०२६ रोजी संपूर्ण महाराष्ट्रात चित्रपटगृहात दाखल होणार आहे.

### मूड इंडिगोमध्ये कॅन्टाबिलची प्रभावी उपस्थिती

**मुंबई : हॅलो प्रभात**

भारताच्या आघाडीच्या परिधान ब्रँड्सपैकी एक असलेल्या कॅन्टाबिल रिटेल इंडिया लिमिटेडने आयआयटी बॉम्बे येथे आयोजित आशियातील सर्वात मोठ्या कॉलेजिएट सांस्कृतिक महोत्सव 'मूड इंडिगो'चा अधिकृत शॉपिंग पार्टनर म्हणून आपली सहभागिता यशस्वीरीत्या पूर्ण केली. या भागीदारीमुळे तरुण ग्राहकांमध्ये कॅन्टाबिलच्या ब्रँड अवेअरनेस आणि रिकॉलला बळकटी मिळाली. संपूर्ण महोत्सव परिसरात उच्च दृश्यमानता आणि इमर्सिव्ह अनुभव निर्माण करत कॅन्टाबिलने ठळक ब्रँड उपस्थिती नोंदवली.

### जनसंपर्क क्रमांक बंद ठेवलेल्या प्रचारात नागरिकांचा थेट रोष

**पुणे : हॅलो प्रभात**

महापालिका निवडणुकीची उमेदवारी मिळाल्यानंतर अनेकांनी जुने जाहीरनामे पुन्हा नव्याने छापून घेतले. आपण, जनतेच्या सेवेसाठी चोवीस तास वर्षभर केंव्हाही उपलब्ध असू, असे धडधडीत आश्वासन अनेकांनी गेल्यावेळीच दिले होते. परंतु, अनेकांनी हे आश्वासन गेल्या सात-आठ वर्षांत पूर्णच केले नाही, नागरिकांना वेळच दिला नाही. आता, यावेळी निवडणुकीच्या जाहीरनाम्यात पुन्हा तेच आश्वासन छापून जुनेच उमेदवार नव्याने नव्या प्रभागात मतदारांच्या भेटीला गेले. विशेष म्हणजे जो मोबाइल क्रमांक संपर्कासाठी होता तोच एका उमेदवाराने गेली अनेक महिने बंद करून ठेवला होता. त्यामुळे तीन वेळा निवडणूक जिंकलेले हा जनतेचा नाथ असलेले उमेदवार पुन्हा मत मागायला गेले तेंव्हा नागरिकांपुढे चांगलेच तोंडावर पडले. महापालिका प्रशासकीय राजवटीत अनेक समस्या वाढल्याने नगरसेवकांना नागरिकांच्या रोषाला सामोर जावे लागले. एका माजी नगरसेवकाने नागरिकांच्या समस्यांना वैतागून जनसंपर्क नंबरच ब्लॉक केले. परंतु, गतवेळी झालेल्या निवडणुकीत याच माजी नगरसेवकांनी आपण नागरिकांच्या सेवेसाठी चोवीस तास उपलब्ध असल्याचे आश्वासन दिले होते. परंतु, कार्यकाळ संपल्यानंतर प्रभागातील कामे प्रशासकांकडून होऊ लागली त्यातून रस्ता, पाणी, सांडपाणी वाहिन्या असल्या समस्या वाढत गेल्या, समस्या सोडविण्यात येणाऱ्या अडचणी नागरिकांना सांगता येइनात त्यामुळे अनेक माजी नगरसेवकांनी चारचाकीला काळ्या काचा लावून घेतल्या तर अनेकांनी आपले जाहिरनाम्यात जनसंपर्कासाठीचे मोबाइल क्रमांक बंद करून ठेवले. मात्र, यातून नागरिकांचा संताप वाढत गेला. आता, महापालिकेची निवडणूक जाहीर झाल्यानंतर हेच जुने उमेदवार पुन्हा निवडणूक रिंगणात नव्याने उतरले आहेत. परंतु, प्रचारसाठी प्रभागमध्ये फिरत असताना नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहेत. प्रभागात पाणी येत नसल्याने मी तुम्हाला अनेक वेळा फोन केला. मात्र, तुमचा फोन गेली अनेक महिने बंद असल्याची तक्रार एका नागरिकाने थेट प्रचारात उमेदवाराकडे केली. आपण, आपला जनसंपर्क बंद करून ठेवला असल्याचे या उमेदवाराच्या लक्षात आले, तेव्हा रेंज प्रॉब्लेम असेल, असे सांगत त्यांनी सारवासारवीही केली.

# मीनाताई मानेंच्या रूपाने रेल्वे इंजिन धावणार!

## धानोरी-कळस-लोहगाव प्रभागात मतदारांची माने यांना पसंती

**पुणे : हॅलो प्रभात**



धानोरी-कळस-लोहगाव प्रभाग क्रमांक एकमधील अनुसूचित जाती प्रवर्गातील महिला उमेदवार लक्ष्मी उर्फ मीनाताई माने(इंगुळकर)यांच्या रूपाने पुन्हा दुसऱ्यांदा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला प्रभागात विजयाची संधी मिळाल्यामुळे प्रभागात इतर उमेदवाराबरोबरच सेनेची मशाल पेटून मनसेचे रेल्वे इंजिन धावणार असल्याची चर्चा कार्यकर्त्यांसह मतदारांमध्ये रंगली आहे.

सध्या पुणे पालिका रणधुमाळीत प्रत्येक पक्षातील उमेदवार हे एकमेकांच्या विरोधात आरोपांच्या फेरी झाडत असल्याचे शहरातील विविध प्रभागातील चित्र असताना शहरासह धानोरी-कळस-लोहगाव प्रभाग एकमध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेना व उद्धव सेना यांची युती होऊन या प्रभागात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने शांत व मनमिळावू असलेल्या याबरोबरच बाराही महिने सर्वसामांन्य जनतेच्या मदतीला धावून जाणाऱ्या लक्ष्मी उर्फ मीनाताई माने(इंगुळकर)यांच्यासह शुभ युतीमधील इतर दोन उमेदवारांनी प्रचारात आघाडी घेतली असून सुरुवातीपासूनच समाजकारणाला प्राधान्य देणाऱ्या लक्ष्मी उर्फ मीनाताई माने(इंगुळकर) यांचे गेल्या अनेक वर्षापासून सुरू असलेले सामाजिक कार्य पाहूनच पक्षाचे अध्यक्ष राजसाहेब ठाकरे यांनी विश्वासाने माने ताई यांच्या गळ्यात उमेदवारीची माळ घातल्याने कारूकर्त्यांमध्ये देखील उत्साहाचे वातावरण पसरून फटाक्यांची आतषबाजी करून जल्लोष साजरा करण्यात आला आहे.

लक्ष्मी उर्फ मीनाताई माने(इंगुळकर) यांच्या उमेदवारीची माळ पडल्यावर त्यांनी पदयात्रेबरोबरच प्रचार सुरू असतानाच यादरम्यान त्यांनी ज्येष्ठ नागरिकांसह तरुण वर्ग यांचे असलेले प्रश्न समजावून घेऊन सोडविण्याचे आश्वासन दिल्यामुळे अनेक नागरिकांनी सुटकेचा श्वास सोडला असतानाच ज्येष्ठ महिलांचा देखील त्यांना मिळालेल्या उमेदवारीमुळे आनंद व्दिगुणित झाला आहे. विशेष करून दोन दिवसापूर्वी कळससह धानोरी भागात काढलेल्या पदयात्रेत स्थानिक मतदारांचा कल मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे.ज्येष्ठ महिलांनी त्यांचे औक्षवंत करून त्यांना विजयी होण्याचा आशीर्वाद दिल्यामुळे कार्यकर्त्यांसह ज्येष्ठ महिलांचा देखील आशीर्वाद त्यांच्या पाठीशी असल्याचे काढलेल्या पदयात्रेवरून स्पष्ट जाणवत असून त्यातच इतर पक्षातील पक्षश्रेष्ठींनी स्थानिक उमेदवारांना प्राधान्य देण्याऐवजी इतर प्रभागातील उमेदवारांना उमेदवारी देऊन निवडणुकीच्या रिंगणात उतरविल्यामुळे हे उमेदवार मतदारांच्या परिचयाचे नसल्याने मतदार हे स्थानिक उमेदवारांना प्राधान्य देणार असल्यामुळे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या अधिकृत उमेदवार लक्ष्मी उर्फ मीनाताई माने यांची ही जमेची बाजू असून त्यांचे पारडे जड असल्याचे दिसून येत असल्यामुळेच मतदारांनी त्यांच्या बाजूने कौल दिल्यामुळे सध्या प्रभागात त्यांचे पारडे जड असल्याचे चित्र स्पष्ट दिसून येत असल्यामुळेच त्या विजयाच्या दावेदार मानल्या जात असल्यामुळेच लक्ष्मी उर्फ मीनाताई माने(इंगुळकर)यांच्या रूपाने दुसऱ्यांदा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे इंजिन सज्ज झाले असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे.

# भाजपचा ठाकरे सेनेला धक्का!

## अधिकृत तसेच बंडखोर उमेदवारांच्या हातात 'कमळ'

**पुणे : हॅलो प्रभात**




पुणे महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाला मोठा राजकीय धक्का बसला आहे. प्रभाग क्रमांक ९ आणि ११ मधील ठाकरे सेनेचे अधिकृत तसेच बंडखोर उमेदवारांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केल्याने शहरातील राजकीय वातावरण तापले आहे. या घडामोडीमुळे कोथरूड परिसरात भाजपची ताकद लक्षणीयरीत्या वाढल्याचे चित्र आहे. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या कोथरूड येथील निवासस्थानी हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. कोथरूड विधानसभा मतदारसंघातील प्रभाग क्रमांक ९ (क, ड) तसेच प्रभाग क्रमांक ११ (अ) मधील ठाकरे सेनेचे उमेदवार, बंडखोर आणि पदाधिकारी भाजपमध्ये दाखल झाले. प्रभाग क्रमांक ९ मधील बंडखोर उमेदवार महेश सुतार, पूजा सुतार, नियोजन समितीचे सदस्य सुखदेव तापकीर, तर प्रभाग क्रमांक ११ (अ) मधील अधिकृत उमेदवार बालासाहेब धनवडे, विद्यार्थी सेनेचे अमर गायकवाड आणि माजी नगरसेवक दिलीप गायकवाड यांनी भाजपची वाट धरली. यावेळी भाजपचे उमेदवार लहू बालवडकर, गणेश कळमकर, रोहिणी चिमटे, अजय मरणे, अभिजीत राऊत उपस्थित होते.

**प्रचाराच्या धामधुमीतच घडलेल्या या सामूहिक पक्षप्रवेशामुळे ठाकरे गटाला कोथरूड परिसरात जोरदार धक्का बसल्याचे मानले जात आहे. या घडामोडींचा येत्या महापालिका निवडणुकीवर परिणाम होण्याची शक्यता आहे. यावेळी मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, याआधीच भाजपचे दोन उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. आता प्रभाग क्रमांक ९ आणि ११ मधील उमेदवारांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याने पक्षाची ताकद दुपटीने वाढली आहे. ही पुणे महापालिका निवडणुकीतील भाजपच्या विजयाची नांदी आहे.**

## कॅलिफोर्निया बदाम वजन व्यवस्थापनास उपयुक्त

**पुणे : हॅलो प्रभात**




नवीन वर्षाच्या सुरुवातीला आरोग्य आणि तंदुरुस्तीवर भर देणाऱ्या भारतीयांसाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. YouGov ने Almond Board of California यांच्या सहकार्याने केलेल्या सर्व्हेनुसार, १० पैकी ७ भारतीयांच्या मते कॅलिफोर्निया बदाम वजन व्यवस्थापनास मदत करतात. या सर्व्हेमध्ये असे आढळले की, बहुसंख्य भारतीय सजग आहार, तृप्ती आणि संतुलित पोषणावर लक्ष केंद्रित करत असून, बदामांचा दररोजच्या सकाळच्या आहारात वाढता समावेश होत आहे. जवळपास ४० टक्के लोक रोज बदाम खातात, तर अनेकजण भूक नियंत्रण, दीर्घकाळ टिकणारी ऊर्जा आणि आरोग्यदायी स्नॅक म्हणून त्यांची निवड करतात.

तज्ज्ञांच्या मते, फायबर, प्रथिने आणि हेल्दी फॅट्सने समृद्ध असलेले बदाम वजन नियंत्रणासोबतच एकूण आरोग्यासाठी उपयुक्त ठरतात. त्यामुळे नवीन वर्षातील आरोग्य संकल्प पूर्ण करण्यासाठी कॅलिफोर्निया बदाम भारतीयांच्या दिनचर्येत महत्त्वाचे स्थान मिळवत असल्याचे चित्र या सर्व्हेतून स्पष्ट झाले आहे.

## सभापती प्रा. राम शिंदे यांच्या हस्ते दर्पण पुरस्कार प्रदान




**पुणे : हॅलो प्रभात**

**■ जिल्हा माहिती अधिकारी या गटात यावर्षी पासून पुरस्कार, पहिल्या पुरस्काराने पुणे जिल्हा माहिती अधिकारी युवराज पाटील सन्मानित**

मराठी पत्रकारितेचे आद्य प्रवर्तक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधी, फलटण यांच्या वतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय प्रतिष्ठेचा 'दर्पण' पुरस्कार पुणे जिल्हा माहिती अधिकारी युवराज पाटील यांना महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

यावर्षीपासून शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील वैशिष्ट्यपूर्ण व प्रभावी लेखन करणाऱ्या अधिकाऱ्याला 'दर्पण' पुरस्काराने सन्मानित करण्याची विशेष बाब महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधीने घोषित केली होती. या नव्या उपक्रमातील पहिला पुरस्कार पुणे जिल्हा माहिती अधिकारी युवराज पाटील यांना जाहीर करण्यात आला होता. मंगळवारी (दि. ६) हा पुरस्कार समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला.



## डेक्कन शुगर संस्थेच्या जागेवर राष्ट्रवादीचे भव्य कार्यालय

**पुणे : हॅलो प्रभात**

### पुण्यात ३०० कोटींचा घोटाळा?

डेक्कन शुगर टेक्नॉलॉजी असोसिएशनच्या शिवाजीनगर येथील जागेवर झालेल्या बांधकामप्रकरणी तब्बल ३०० कोटी रुपयांच्या घोटाळ्याचा आरोप पुढे आला असून, यामुळे पुण्याच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. माहिती अधिकार कार्यकर्ते विजय कुंभार यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती देत सखोल चौकशीची मागणी केली आहे.

डेक्कन शुगर टेक्नॉलॉजी असोसिएशनच्या सुमारे १५ हजार चौ.फुट जागेवर ६३ हजार चौ.फुटांचे बांधकाम करण्यात आले आहे. या इमारतीत नुकतेच राष्ट्रवादी काँग्रेसचे आलिशान कार्यालय सुरू झाले आहे. मात्र ही जागा भाडेतत्त्वावर देण्यात आलेली असताना, विक्रीचा कोणताही अधिकार नसतानाही संबंधित कंपनीने इमारतीतील सहा मजले परस्पर विकून ३०० कोटींहून अधिकचा गैरव्यवहार केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

धर्मादाय आयुक्तांनी संस्थेची जागा भाड्याने देण्यास परवानगी दिल्यानंतर निविदा प्रक्रिया राबवण्यात आली. त्यानुसार कळवृक्ष प्लांटेशन प्रा. लि. या कंपनीला ६० वर्षांच्या कराराने जागा देण्यात आली होती. मात्र भाडेकराराच्या अटींचा भंग करून जागेचा व्यावसायिक वापर व विक्री केल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. या प्रकरणात साहिल प्रधान यांना पॉवर ऑफ अटर्नी देण्यात आली होती. हेच साहिल प्रधान मुंढवा जमीन घोटाळा प्रकरणात साक्षीदार असल्याचेही निदर्शनास आले आहे.

भाडेतत्त्वावर दिलेल्या जागेवर बँक कर्ज घेण्यास मनाई असतानाही, सुमारे २५ कोटी रुपयांचे कर्ज काढण्यात आल्याचा आरोप आहे. २०१७ पासून सुरू असलेले बांधकाम नुकतेच पूर्ण झाले असून, त्यानंतर राजकीय पक्षाचे कार्यालय सुरू झाल्याने व्यवहारांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या संपूर्ण व्यवहाराची आर्थिक, कायदेशीर आणि प्रशासकीय पातळीवर सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी विजय कुंभार यांनी केली आहे. प्रकरण गंभीर स्वरूपाचे असल्याने येत्या काळात या मुद्द्यावर राजकीय आरोप-प्रत्यारोप वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# लातूरमधून विलासरावांच्या आठवणी पुसल्या जातील

## भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे वादग्रस्त विधान

**पुणे : हॅलो प्रभात**




आगामी लातूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केलेल्या एका विधानामुळे राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे. ५ जानेवारी २०२६ रोजी लातूर येथे झालेल्या भाजपच्या कार्यकर्ता मेळाव्यात बोलताना चव्हाण यांनी माजी मुख्यमंत्री दिवंगत विलासराव देशमुख यांच्याबाबत वादग्रस्त विधान केल्याने मोठा वाद निर्माण झाला आहे.

कार्यकर्त्यांचा उत्साह पाहून चव्हाण म्हणाले, "तुमचा उत्साह बघता, लातूर शहरातून विलासराव देशमुखांच्या आठवणी १०० टक्के पुसल्या जातील यात शंका नाही." हे विधान त्यांनी कार्यकर्त्यांना घोषणा देण्याचे आवाहन केल्यानंतर केले.

या वक्तव्यावर काँग्रेसकडून तीव्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत. विलासराव देशमुख यांचे सुपुत्र व आमदार अमित देशमुख यांनी या विधानाचा निषेध करत ते दुर्दैवी, असंवेदनशील आणि लातूरच्या संस्कृतीला न शोभणारे असल्याचे म्हटले. त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, लातूरच्या जनतेच्या मनातून विलासराव देशमुख यांचे योगदान कधीही पुसले जाऊ शकत नाही.

दरम्यान, अभिनेता रितेश देशमुख यांनीही सोशल मीडियावर अप्रत्यक्ष शब्दांत प्रतिक्रिया देत वडिलांच्या कार्याचा उल्लेख केला असून त्यांच्या योगदानावर लातूरकरांचा कायम विश्वास असल्याचे संकेत दिले आहेत.

काँग्रेस प्रवक्ते सचिन सावंत यांच्यासह पक्षाच्या इतर नेत्यांनी भाजपवर द्वेषाचे राजकारण केल्याचा आरोप केला आहे. त्यांनी सांगितले की, विकासाऐवजी इतिहास पुसण्याची भाषा करणारे नेते जनतेच्या प्रश्नांपासून पळ काढत आहेत.

या विधानाच्या निषेधार्थ लातूरमध्ये काँग्रेस कार्यकर्त्यांनी निदर्शने करत रवींद्र चव्हाण यांनी जाहीर माफी मागावी, अशी मागणी केली आहे. महानगरपालिका निवडणूक १५ जानेवारी २०२६ रोजी होणार असून, या विधानामुळे निवडणूक प्रचार अधिकच तापण्याची चिन्हे दिसत आहेत.

हॅलो प्रभात

# अहिल्यानगर

जिल्हा विशेष

बुधवार, दि. ०७ जानेवारी २०२६






## थोडक्यात पण महत्वाचे



### पत्रकारांनी केलेला सन्मान कौतुकास्पद : संजय ठेंगे

**राहूरी : हॅलो प्रभात**

महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिनानिमित्त राहुरीतील पत्रकारांच्या वतीने पोलीस अधिकारी व अंमलदारांचा कृतज्ञता सोहळा आयोजित करण्यात आला होता. राहुरी पोलीस स्टेशन येथे झालेल्या या कार्यक्रमात पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्यासह सर्व कर्मचाऱ्यांना सन्मानपत्र व गुलाबपुष्प देऊन गौरविण्यात आले. समाजाच्या सुरक्षेसाठी अहोरात्र झटणाऱ्या पोलिसांप्रती कृतज्ञता व्यक्त करणे आणि पोलीस-पत्रकार समन्वय अधिक दृढ करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. पत्रकारांच्या या उपक्रमाचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी विशेष कौतुक केले. या प्रसंगी तालुक्यातील पत्रकार व पोलीस कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर संपन्न

**राहूरी : हॅलो प्रभात**

एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालय, हडपसर, पुणे यांच्या वतीने दिव्यांग शक्ति सेवा संस्था, प्रहार दिव्यांग संघटना व राम डेंटल क्लिनिक यांच्या संयुक्त विद्यमाने राहुरीत मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया (लेन्ससहित) तसेच दंत तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले. हे शिबिर श्री संत गाडगेबाबा आश्रम शाळा, राहुरी येथे पार पडले. शिबिराचे उद्घाटन पुणे येथील एच. व्ही. देसाई हॉस्पिटलचे संचालक डॉ. परवेज बिलीमोरया, सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक एम. एच. पाचरणे, ज्येष्ठ शिक्षक संजय इधे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष होते महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे सेवानिवृत्त संचालक शरद पाटील. या शिबिरात ८५ ज्येष्ठ नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली, त्यापैकी २५ रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली. शिबिराचे वैशिष्ट्य म्हणजे सर्व तपासणी व शस्त्रक्रिया लेंससहित पूर्णपणे मोफत होणार आहेत.



### साई कुलकर्णीची स्कॉलरशिपमध्ये गगन भरारी

**कोपरगाव : हॅलो प्रभात**

नासिक येथिल बी.पी.पाटील जुनियर कॉलेज आणि दै.पुढारी वृत्तपत्र माध्यमाच्या संयुक्त विद्यमाने ए.पी.जे. अब्दुल कलाम शिष्यवृत्ती परीक्षेत यावर्षी तालुका स्तरीय स्पर्धा परीक्षा १४ डिसेंबर रोजी विद्यालयात पार पडली. या परीक्षेत सुमारे ५५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या विद्यार्थ्यांमधून विद्यालयाचा कु.साई नारायण कुलकर्णी हा तालुक्यात प्रथम आला असुन त्याला ५१००० ची स्कॉलरशिप मिळाली. त्यानंतर पार पडलेल्या जिल्हास्तरीय स्पर्धात पिंपळगाव बसवंत या ठिकाणी असणाऱ्या बीपी पाटील जुनिअर कॉलेज मध्ये आयोजित या स्पर्धेत अहिल्यानगर व नाशिक दोन्ही जिल्हातुन एकूण ५५०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला या मध्ये देखिल श्रीमान गोकुळचंदजी विद्यालयाचा विद्यार्थी कु.साई नारायण कुलकर्णी हा द्वितीय आला असुन त्याला १२१००० रु इतकी स्कॉलरशिप मिळाली. आज पत्रकार दिनाचे औचित्य साधून सन्माननीय पत्रकार व संस्थाचालकाच्या वतीने कु.साई कुलकर्णी व पालकाचा सत्कार केला. या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष कैलास ठोळे, सचिव दिलीप अजमेरे ,स्थानिक स्कुल कमिटीचे चेअरमन चंद्रकांत ठोळे ,सहसचिव सचिन अजमेरे ,आनंद ठोळे, डॉ. अमोल अजमेरे, राजेश ठोळे संदीप अजमेरे, माजी मुख्याध्यापक मकरंद कोन्हाळकर, ज्येष्ठ कला शिक्षक दिलीप तुपसैंदर मुख्याध्यापक रघुनाथ लकारे, उपमुख्याध्यापक अनिल अमृतकर,पर्यवेक्षक बलभिम उल्हारे यांनी साई कुलकर्णीचे त्याचबरोबर त्याचे मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे देखिलअभिनंदन केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिगंबर देसाई यांनी केले.

### घरात शिरून तरुणीला लुटले

**पुणे : हॅलो प्रभात**

कोरेगाव पार्क परिसरातील एका सदनिकेत घुसून चोरट्यांनी तरुणीला चाकूचा धाक दाखवत साडेअकरा लाख रुपयांचे सोन्याचे दागिने लुटून नेल्याची धक्कादायक घटना घडली. चोरट्यांनी केलेल्या मारहाणीत तरुणी जखमी झाली असून, या प्रकरणी कोरेगाव पार्क पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार तरुणी कोरेगाव पार्कमधील गल्ली क्रमांक पाच येथील एका सोसायटीत वास्तव्यास आहे. रविवारी (ता. ४) सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास दोन चोरटे सदनिकेत शिरले. त्यानंतर चोरट्यांनी तरुणीला चाकूचा धाक दाखवत कपाटातून ११ लाख ४० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने काढून घेतले. या वेळी तरुणीने प्रतिकार केला असता चोरट्यांनी तिला मारहाण केली. तरुणीला धमकावत चोरटे घटनास्थळावरून पसार झाले. या घटनेनंतर तरुणीने तातडीने कोरेगाव पार्क पोलिसांना माहिती दिली. गुन्हे शाखेचे पोलिस उपायुक्त निखिल पिंगळे, परिमंडळ पाचच्या पोलिस उपायुक्त राजलक्ष्मी शिवणकर, सहाय्यक आयुक्त संगीता अल्फान्सो-शिंदे आणि वरिष्ठ पोलिस निरीक्षक विजयकुमार डोके यांनी घटनास्थळी भेट दिली.

# सखी मतदान केंद्रावरील महिला कर्मचाऱ्यांचा गौरव

**शेवगाव : हॅलो प्रभात**

अजय नजन



शेवगाव नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ दरम्यान केंद्र क्रमांक १२/३ नानासाहेब भारदे प्राथमिक शाळा, शेवगाव येथील सखी मतदान केंद्रावर महिला कर्मचाऱ्यांनी केलेल्या उत्कृष्ठ व शिस्तबद्ध कामकाजाबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला.

या मतदान केंद्रावर केंद्राध्यक्ष म्हणून किर्ती शेषराव पालवे (जि. प. प्राथमिक शाळा, जोहरापूर) तसेच मतदान अधिकारी म्हणून रोहिणी प्रभाकर साबळे (जि. प. प्राथमिक शाळा, जोहरापूर), सविता सर्जेराव बुधवंत (जि. प. प्राथमिक शाळा, बोडखे), रिता रंगनाथ गांगुर्डे (जि. प. प्राथमिक शाळा, वरूर खुर्द) व खान कौसर बानो नादर (जि. प. प्राथमिक शाळा, इंदिरानगर उर्दू) यांनी अत्यंत जबाबदारीने व कौशल्यपूर्ण कामकाज पार पाडले.

सदरचे काम निवडणूक निर्णय अधिकारी सुभाष दळवी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार आकाश दहाडदे आणि सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी विजया घाडगे यांच्या प्रेरणेने करण्यात आले. या कामासाठी गटविकास अधिकारी सोनल शहा, नायब तहसीलदार राजेंद्र बकरे, संजय गायकवाड, निलेश वाघमारे, गटशिक्षणाधिकारी शैलजा राऊळ, नगरपरिषदेचे अच्युत नीळ, सुनिल पगारे, मदन गुसिंगे, शिक्षक बँकेचे संचालक रमेश गोरे तसेच महसूल सहाय्यक सुरेश बर्डे यांचे मार्गदर्शन लाभले.

सखी मतदान केंद्रावरील उत्कृष्ठ कामकाजाची दखल घेत तहसीलदार आकाश दहाडदे, गटशिक्षणाधिकारी शैलजा राऊळ व नगरपरिषदेचे करनिरीक्षक मदन गुसिंगे यांच्या हस्ते महिला कर्मचाऱ्यांना सन्मानचिन्हे व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक बँकेचे संचालक रमेश गोरे यांनी केले.

## बदलीसाठी तीन लाखांची लाच!

**पुणे : हॅलो प्रभात**




कोल्हापूर आरोग्य परिमंडळातून पुणे परिमंडळात आरोग्यसेवकाच्या बदलीसाठी तीन लाख रुपयांची लाच स्वीकारताना पुणे जिल्हा परिषदेचे आरोग्यसेवक रामकिसन गंगाधर घ्यार याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली. त्यानंतर सुरू झालेल्या चौकशीत आरोपी आणि उपसंचालक डॉ. भगवान पवार यांचा फोनवरून बरेचदा संपर्क आल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे डॉ. पवार यांच्या अडचणीत वाढ झाली असून, त्यांची चौकशी होणार आहे. दरम्यान, डॉ. पवार सोमवारी तातडीने मुंबईला रवाना झाल्याचे समजते. तक्रारदार आरोग्यसेवकाची गेल्या वर्षी जून महिन्यात पुण्यात बदली झाली. त्याने इंदापूरमधील प्राथमिक आरोग्य केंद्रात रिक्त पदी बदलीसाठी अर्ज केला होता. परंतु, डॉ. भगवान पवार यांनी तक्रारदाराला नवीन प्रशासकीय इमारतीतील आरोग्य उपसंचालक कार्यालयात रुजू करून घेतले. घ्यार हा कर्मचारी डॉ. भगवान पवार यांच्या संपर्कातील असून, त्याला भेटण्याबाबत डॉ. पवार यांनी सांगितल्याची नोंद लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली आहे. आरोपी घ्यार यानेही चौकशीत 'साहेबां'च्या सांगण्यावरून व्यवहार केल्याची कबुली दिल्याचे विश्वसनीय सूत्रांनी सांगितले.

## प्राजक्त तनपुरे हे व्हिजन असलेले नेतृत्व : प्रभाकर गाढे

**राहुरी : हॅलो प्रभात**



प्राजक्त तनपुरे हे उच्च शिक्षित नेतृत्व आहे आपल्या शिक्षणाचा उपयोग त्यांनी आमदारकीच्या काळात खऱ्या अर्थाने मतदार संघाच्या विकासासाठी केला. पूर्वी शेतकऱ्यांची डीपी जळल्यानंतर शासनाच्या धोरणामुळे डीपी भरण्याकरिता शेतकर्यांना वर्गणी गोळा करावी लागत असे. त्यानंतर स्वतःच्या साधनामध्ये ती डीपी MSEB च्या वर्कशॉप मध्ये पोहोच करवी लागत असे व डीपी भरण्यासाठी MSEB च्या कार्यालयाकडे पाठपुरावा करावा लागत असे यामध्ये भरपूर दिवस वाया जात असत. त्यामुळे पाणी असताना देखील त्याठिकाणी डीपी जळाल्यामुळे शेतीसाठी लाईट नसल्याने शेतकऱ्याच्या पिकाची जळून राख रांगोळी होत असे. दादा आमदार झाले व दादांना उर्जा खात्याचे राज्यमंत्रिपद मिळाले. या मंत्रीपदाचा उपयोग त्यांनी आपल्या मतदार संघातील व मतदार संघात नसलेल्या राहुरी तालुक्यातील ३२ गावातील शेतकऱ्यांसाठी केला. डीपी जळण्याच्या ज्या समस्या होत्या त्यावर उपाय म्हणून ठीकठिकाणी सबस्टेशनची क्षमता वाढवून डीपीवर असणारा अतिरिक्त लोड कमी करण्यासाठी मागेल त्याला डीपी देण्याची त्यांनी मोहीम राबविली व या मोहिमे अंतर्गत अतिरिक्त लोड असलेल्या डीपीवर लोडचे विभाजन करून त्याठिकाणी शेतकऱ्यांच्या बांधावर शेकडो नवीन डीप्या मोफत बसून दिल्या. त्यामुळे आज डीपी जळण्याचे प्रमाण ०.१% देखील राहिले नाही. तसेच शेतकऱ्यांना दिवसा लाईट मिळावी म्हणुन दादांनी बाभूळगाव, आरडगाव व इतर ठिकाणी सौरउर्जेचे प्रकल्प उभे केले आज त्या गावाच्या परिसरातील सर्व गावात शेतीसाठी १२ तास दिवसा लाईट मिळते याचे सर्व श्रेय प्राजक्त तनपुरे यांचे आहे.

यापुढचे सर्वात मोठे व्हिजन प्राजक्त तनपुरे होते पण ते पूर्ण झाले नाही ते व्हिजन म्हणजे राहुरी बारागाव नांदूर मार्गे वावरथ जांभळी राहुरी तालुक्यातील धरण्याच्या पाण्यामुळे वावरथ जांभळी हा दुर्लक्षित भाग राहिला आहे. या भागाकडे जाण्याकरीता धरण्याच्या पाण्यामध्ये पूल बांधून राहुरी बारागाव नांदूर मार्गे वावरथ जांभळीकडे जाण्याचा मार्ग तयार करण्यासाठी दादांनी शासनाकडे प्रस्ताव पाठवला होता. परंतु सत्ता बदल झाल्यामुळे हा पूल प्रत्यक्षात होऊ शकला नाही. हा पूल झाला असता तर आपल्या सर्वांना वावरथ जांभळीतून पारनेर मधून पुणे रोडला जाता आले असते. त्यामुळे राहुरी पुणे रोडचे अंतर अंदाजे ४० ते ५०० किमीचे कमी झाले असते. अशा नेतृत्वाला आपण सर्वांनी पुन्हा एकदा आमदार म्हणून विधानसभेत पाठविले पाहिजे.

## आबासाहेब काकडे विद्यालयात पत्रकारांचा सन्मान

**शेवगाव : हॅलो प्रभात**




समाजाचा आरसा म्हणून कार्य करणारे पत्रकार सत्य, निडरता व प्रामाणिकपणे जनतेसमोर मांडण्याचे महान कार्य करीत असतात. लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून पत्रकारांचे योगदान अमूल्य असल्याचे प्रतिपादन आबासाहेब काकडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आयोजित पत्रकार दिनाच्या कार्यक्रमात करण्यात आले.

मराठी पत्रकारितेचे जनक दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त संपूर्ण महाराष्ट्रभर पत्रकार दिन साजरा केला जातो. त्या अनुषंगाने शेवगाव तालुक्यातील विविध वर्तमानपत्रांचे संपादक व पत्रकार बांधवांचा विद्यालयाच्या वतीने शाल व लेखणी देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी सचिन सातपुते, रावसाहेब मरकड, रवी उगलमुगले, रामनाथ रुईकर, बाळासाहेब खेडकर, सुभाष बुधवंत, अजय नजन, नरहरी शहाणे, सुनील नजन, दादासाहेब डोंगरे, सुरेश पाटील, अलीम शेख, संदीप देहाडराय, लक्ष्मण साळुंके, ऋषिकेश काळे, संदीप माने, तेजस ढाकणे आदी पत्रकार उपस्थित होते.

पत्रकारांच्या लेखणीला सदैव सत्य व न्यायाची धार लाभो, अशा शुभेच्छा विद्यालयाचे प्राचार्य संपतराव दसपुते तसेच आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाच्या आर्थिक विभाग प्रमुख सौ. भाग्यश्री पाटील यांनी दिल्या. कार्यक्रमास पर्यवेक्षक रवींद्र आगळे, अनिल जगताप, संदीप काळे, रामेश्वर पालवे, दत्ता देहाडराय, चंद्रकांत बर्डे तसेच श्रीमती शेख जरीना आदी मान्यवर उपस्थित होते

## दिरानेच केला वहिनीचा खून, घर व जमिनीचा वाद

**पुणे : हॅलो प्रभात**

घर व जमिनीच्या कारणावरून वाद घालून चाकूने वार करून सख्ख्या दिराने भावजयीचा निर्घृण खून केला. जुन्नर तालुक्यातील निमगिरी गावात सोमवारी (दि. ५) सायंकाळी ६ वाजता ही खळबळजनक घटना घडली. अरुणा शरद साबळे (वय ३८) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी अरुणा यांचे पती शरद निंबा साबळे (रा. ४४) यांनी जुन्नर पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यानुसार तुषार निंबा साबळे (वय ४८) या खून करणाऱ्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अरुणा साबळे या त्यांच्या घराच्या अंगणात काम करत होत्या. या वेळी तेथे त्यांचा दीर तुषार साबळे हा आला. त्याने घर व जमिनीच्या कारणावरून वाद घातला. काही वेळाने हातातील चाकूने अरुणा यांच्या छातीवर, हातावर वार करून त्यांना ठार मारले आहे. त्यानंतर तो तेथून पळून गेला. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून पसार झालेल्या तुषारचा शोध घेण्यासाठी विविध पथके तयार करून रवाना केली.

## आत्मा मालिक गुरुकुलचे बालचित्रकला स्पर्धेत यश



**कोपरगाव : हॅलो प्रभात**

कोपरगाव तालुका पंचायत समितीच्या वतीने आयोजित महाराष्ट्र राज्य बालचित्रकला स्पर्धा २०२५ मध्ये आत्मा मालिक इंग्लिश मीडियम गुरुकुल व ज्युनिअर कॉलेज, कोकमठाण येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या स्पर्धेत शाळेतील १५ विद्यार्थ्यांची जिल्हास्तरासाठी निवड झाल्याने संस्थेचा शैक्षणिक मान उंचावला आहे. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपल्या कल्पकता, सर्जनशीलता आणि कलागुणांचे दर्शन घडवले. त्यांच्या चित्रांमधून सामाजिक जाणीव, पर्यावरण संवर्धन, सांस्कृतिक मूल्ये आणि सर्जनशील दृष्टिकोन प्रभावीपणे व्यक्त झाला, ज्यामुळे परीक्षकांनी त्यांना विशेष दखल दिली. गट १ (इ. १ ली – २ री): अनुज डोंगरे, अंकिता पावरा, मनस्वी आगळे, मानसी पडोळे, गट २ (इ. ३ री – ४ थी): श्रेया हरळे, स्वरा बिडवे, अर्णव भागवत, शारदा पावरा, संस्कार पर्वत, श्रद्धा टिळेकर, गट ३ (इ. ५ वी – ७ वी): युवराज शिंदे, आराध्या लोंढे, गट ४ (इ. ८ वी – १० वी): रितिका होंड, सिद्धी सरोदे, अजय पावरा, विद्यार्थ्यांच्या यशामागे चित्रकला शिक्षकांचे मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण परिश्रम मोलाचे ठरले. शिक्षक ज्ञानेश्वर पर्वत, गोकुळ गायकवाड, निलेश सावंत, स्वप्निल पाटील, संदीप धनवटे, सोनाली ठाकूर व राहुल गायकवाड यांचे विशेष कौतुक करण्यात आले. या घवघवीत यशाबद्दल सद्गुरु आत्मा मालिक माऊली यांच्या कृपाशीर्वादासह संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी, उपाध्यक्ष बाळासाहेब गोर्डे, सरचिटणीस हनुमंतराव भोंगळे, कोषाध्यक्ष विठ्ठलराव होन, विश्वस्त प्रकाश गिरमे, प्रदीपकुमार भंडारी, व्यवस्थापक सुधाकर मलिक, साईनाथ वर्पे, मीरा पटेल, प्राचार्य माणिक जाधव, मीनाक्षी काकडे, नितीन सोनवणे तसेच सर्व विभागप्रमुखांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

# पॅनलमध्ये 'संशय कल्लोळ'

## विजयासाठी उमेदवार थेट विरोधकांच्या संपर्कात?

**पिंपरी: हॅलो प्रभात**



**मतदार मात्र शांतपणे संपूर्ण घडामोडीकडे लक्ष ठेवून आहेत. स्थानिक प्रश्न, विकासाच्या अपेक्षा, मूलभूत सुविधांचा अभाव आणि नेतृत्वाची विश्वासार्हता या मुद्द्यांवर मतदार चर्चा करत असल्याचे चित्र दिसत आहे. शेवटच्या टप्प्यात पॅनलमधील संशयाचा कल्लोळ निवडणुकीच्या समीकरणांवर किती परिणाम करतो, याकडे राजकीय वर्तुळासह संपूर्ण शहराचे लक्ष लागून राहिले आहे.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची निवडणूक १५ जानेवारी रोजी होणार असून, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील राजकीय वातावरण तापू लागले आहे. तर दुसरीकडे आपला विजय सुकर व्हावा यासाठी प्रमुख पक्षातील उमेदवार प्रतिस्पर्धी पक्षातील वेगळा गटातील उमेदवारांची संधान साधत आहेत. याबाबतच्या बातम्या बाहेर येऊ लागल्याने पक्ष उमेदवारांच्या पॅनलमध्ये संशय कल्लोळ निर्माण झाला आहे. निवडणुकीसाठी इच्छुकांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर पक्षांतर्गत चर्चा, समन्वय आणि मनधरणीचे सत्र वेगाने सुरू झाले. अनेक ठिकाणी पक्ष नेतृत्वाच्या मनधरणीला यश मिळाले असून काहींनी आपली उमेदवारी मागे घेतली आहे. तरीही काही अपक्ष उमेदवार रिंगणात ठाम असल्याने लढत अधिक चुरशीची होताना दिसत आहे.या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), भाजप यांच्यासह शिवसेना (उबाठा), राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट), शिवसेना (शिंदे गट), काँग्रेस, आरपीआय या प्रमुख पक्षांचे उमेदवार रणांगणात उतरले आहेत. बहुतांश प्रभागांत मुख्य लढत भाजप विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) अशी रंगण्याची चिन्हे आहेत.

तर काही ठिकाणी बहुरंगी लढत होण्याचीही शक्यता नाकारता येत नाही.

प्रचाराला वेग आला असून, एका बाजूला उमेदवार घराघरात संपर्क साधत आहेत, नागरिकांच्या भेटीगाठी घेत आहेत, कोपरा सभा, पदयात्रा, रॅली यांच्या माध्यमातून शक्तीप्रदर्शन सुरू आहे. दुसरीकडे, प्रतिस्पर्धी पक्षातील वेगवेगळ्या गटांशी 'समन्वय' साधण्याचे गुप्त प्रयत्नही सुरू असल्याची कुजबुज राजकीय वर्तुळात आहे.

"तू मला मदत कर, मी तुला मदत करतो" अशा प्रकारच्या आश्वासनांचा उच्चार पॅनलबाहेरील गोपनीय बैठकींमध्ये केला जात असल्याचे बोलले जात आहे.यातील वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे फोन रेकॉर्डिंग होण्याची भिती असल्याने अशा संपर्कासाठी उमेदवार मोबाइलचा सर्रास वापर टाळत आहेत. नियमित फोन कॉल्सऐवजी व्हॉट्सॲप कॉलिंग, लघुसंदेश आणि तिसऱ्या व्यक्तींमार्फत संदेशवहनाचा आधार घेतल्याची चर्चा आहे. त्यामुळे पॅनेलमध्येच एकमेकांबद्दल संशयाचे वातावरण तयार होऊ लागले आहे.

काही ठिकाणी प्रचारापेक्षा "आपला कोण कोणाशी बोलतोय?" याचाच उलगडा करण्यावर कार्यकर्त्यांचे अधिक लक्ष केंद्रित झाल्याचे दिसते. क्रॉस वोटिंगची शक्यता ही या घडामोडींचे केंद्रबिंदू बनली आहे. पॅनलप्रमाणे एकदिलाने मतदान व्हावे, हा पक्षांचा प्रयत्न असताना काही उमेदवार स्वतःच्या विजयाला प्रथम प्राधान्य देत प्रतिस्पर्धी पक्षातील वेगळ्या गटांशी संधान साधत असल्याची चर्चा रंगते आहे.

क्रॉस वोटिंग झाल्यास संपूर्ण पॅनलच्या निकालावर त्याचा परिणाम होऊ शकतो, हे माहीत असतानाही काही जण जोखीम घेण्यास मागेपुढे पाहत नाहीत, अशी टीका कार्यकर्त्यांकडून ऐकावयास मिळत आहे.या पार्श्वभूमीवर पॅनेलमध्ये संशयाचा कल्लोळ वाढत चालला आहे. कोण कोणाशी संपर्कात आहे, कोण कुणाला गुपचूप मदत करणार, कोणावर विश्वास ठेवायचा या प्रश्नांनी पक्षांच्या आंतरिक बैठका अधिक तापल्या आहेत. उमेदवारांमधील संवाद कमी होणे, अचानक बदललेली प्रचार रणनीती आणि गटगटांत होणाऱ्या बैठका यामुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.